**शासकीय कामकाजात सुलभता, गतिमानता व सुसूत्रता आणण्यासाठी गुगल ड्राईव्ह (Google Drive) चा वापर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन परिपत्रक क्र.IELD-15/332/2024-ADMIN-2**
**पोटमाळा (एम-६),विस्तार इमारत,मंत्रालय,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.**
**दि.२५.९.२०२४**

**वाचा:**

(१) शासन परिपत्रक,सा.प्र.वि.(मातं.),क्र.मातंस २०२२/प्र.क्र.६२/से-१/३९, दि.२३.२.२०२३
(२) शासन पत्र,सा.प्र.वि,क्र.संकीर्ण- २०२३/प्र.क्र.०२/१८(र.व.का.), दि.१९.३.२०२४
(३) शासन पत्र क्र.IELD-15/151/2024-ADMIN-2,दि.१८.४.२०२४

**प्रस्तावना**-

शासकीय कामकाजात संगणकाचा अधिकाधिक वापर करून शासकीय कामकाज गतिमान व्हावे,कामकाजात सुसूत्रता यावी तसेच निर्णय प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी दि.१.४.२०२३ पासून मंत्रालयीन विभागांमध्ये ई-ऑफीस प्रणाली कार्यान्वित केलेली आहे.सदर प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यामुळे ई-ऑफीस प्रणालीची निकड विचारात घेऊन राज्य शासनाकडून "महाराष्ट्र कार्यालयीन कार्यपद्धती नियमपुस्तिका,१९६३" मध्ये सुधारणा करण्यात येऊन **"महाराष्ट्र कार्यालयीन कार्यपद्धती नियमपुस्तिका, २०२३"** तयार करण्यात आलेली आहे. सदर नियमपुस्तिकेचे अवलोकन केले असता शासकीय कामकाज ई-ऑफीस च्या माध्यमातूनच करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.त्यानुषंगाने उद्योग,ऊर्जा ,कामगार व खनिकर्म विभागात देखील ई-ऑफीस चा वापर करण्याबाबत या कार्यासनाकडून वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

उद्योग,ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागातील प्रशासन-२ कार्यासनाकडून तसेच इतर काही कार्यासनाकडून विविध बाबींचे समन्वय करण्याचे कामकाज हाताळण्यात येते.त्यामध्ये मुख्यत्वेकरून विधीमंडळ कामकाज समन्वय, ई ऑफीस प्रणाली ची अंमलबजावणी, माहिती अधिकार अधिनियमांतर्गत अहवाल तयार करणेसाठी माहिती संकलित करण्याबाबत समन्वय, विविध राष्ट्रीय/राज्य आयोगांना पाठवावयाच्या अहवालांचे समन्वय इत्यादी बाबींचा समावेश होतो. यासाठी विविध विवरणपत्रात माहिती मागवावी लागते.त्यामुळे सदरची माहिती या विभागाच्या चारही प्रभागाकडून तसेच सदर प्रभागांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेण्याची प्रक्रिया

वेळखाऊ आहे.तसेच सदर माहितीचे संकलन करण्याची प्रक्रिया देखील क्लिष्ट आहे. त्यामुळे सदरची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ,गतिमान व कालबद्ध करण्यासाठी शासकीय कामकाजात **गुगल ड्राईव्ह (Google Drive)** चा वापर करणे अधिक सोयीस्कर होईल.

मंत्रालयातील सर्व विभागात **गुगल ड्राईव्ह (Google Drive)** चा access देण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर सुविधेचा वापर केल्यास संबंधित कार्यासनांना विहित विवरणपत्र सुलभतेने उपलब्ध होतील. त्यामुळे सदर विवरणपत्रांमध्ये माहिती भरणे त्यांच्यासाठी अधिक सोयीस्कर होईल. सदर विवरणपत्रांमध्ये संबंधित कार्यासनाकडून माहिती भरण्यात आल्याने त्याचे पुन्हा संकलन करून समन्वय कार्यासनास पुन:श्च माहिती भरण्याची आवश्यकता राहणार नाही. त्यामुळे सदर कामाच्या वेळेत बचत होईल. योग्य व अचूक माहिती भरण्याची जबाबदारी संबंधित कार्यासनाची राहणार असल्यामुळे शासकीय कामकाज अधिक जबाबदारीने केले जाईल. तसेच विभागाची एकत्रित माहिती संबंधित विभागाच्या विभागप्रमुखांना तसेच संबंधित नियंत्रक अधिकारी/उप सचिव/सह सचिव यांना २४*७ कधीही पाहता येईल. यामध्ये कागदोपत्री चालणारा प्रवास कमी होऊन वेळेची मोठ्या प्रमाणात बचत होण्यास मदत होईल.

**परिपत्रक-**

ई-ऑफीस कामकाजाचा भाग म्हणून विभागांतर्गत शासकीय कामकाजात गतिमानता व सुलभता आणण्याच्या दृष्टीने **गुगल ड्राईव्ह (Google Drive)** चा वापर करण्याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभागात समन्वयाचे कामकाज सुलभ व गतिमान करण्याकरिता **गुगल ड्राईव्ह (Google Drive)** चा वापर करण्यात यावा. सदर गुगल ड्राईव्ह वर आवश्यक ती विवरणपत्रे (Microsoft Word/Microsoft Excel) उपलब्ध करून देण्यात येतील.आवश्यकता असेल त्यावेळी पत्राद्वारे संबंधित कार्यासनांना कळविण्यात येईल. त्यानुसार संबंधित कार्यासनांनी गुगल ड्राईव्ह वर उपलब्ध करून दिलेल्या विवरणपत्रात माहिती भरावी/अद्ययावत करावी.

२. उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभागातील सर्व कार्यासनांना सोबत जोडलेल्या जोडपत्रात ई-मेल आयडी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

३. आवश्यक असलेल्या माहितीसंबंधीची विवरणपत्रे Google Drive वर उपलब्ध करून देण्यात येतील.

४. Google Drive वर उपलब्ध करून देण्यात येणा-या विवरणपत्रात आवश्यक माहिती भरणेसाठी संबंधित कार्यासनांना edit आणि view चा पर्याय देण्यात आलेला आहे.त्यामुळे संबंधित कार्यासनांना सदरची माहितीमध्ये आवश्यक तो बदल करण्याची मुभा असेल.

**५.** संबंधित कार्यासनांनी केवळ त्यांच्याशी निगडित मुद्यांबाबतची तसेच त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांची माहिती भरावयाची आहे.अन्य कार्यासनाशी/क्षेत्रीय कार्यालयाशी निगडित मुद्यांबाबतची माहिती भरण्यात येऊ नये वा त्यामध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यासनांची राहील.

**६.** सदर सुविधेचा वापर करताना कोणतीही समस्या उद्भवल्यास प्रशासन-२ कार्यासनाशी संपर्क साधण्यात यावा.

**सदर परिपत्रक माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशाने.

**Signed by Ghanshyam Narayan Pausakar**
**Date: 25-09-2024 18:13:22**

**(घनश्याम लक्ष्मी नारायण पाऊसकर)**
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत-

(१) अपर मुख्य सचिव (खनिकर्म),मंत्रालय,मुंबई
(२) अपर मुख्य सचिव (ऊर्जा), मंत्रालय,मुंबई
(३) प्रधान सचिव (उद्योग),मंत्रालय,मुंबई
(४)प्रधान सचिव (कामगार),मंत्रालय,मुंबई
(५) सर्व सह सचिव/उप सचिव,उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग,मंत्रालय,मुंबई
(६) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग,मंत्रालय,मुंबई
(७)निवडनस्ती : प्रशासन-२ कार्यासन